# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २१.०८.२०२६ शुक्रवार**

**१) यशोधरानगर पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी :—**

आज दिनांक २१.०८.२०२६ रोजी १०.०० वा.चे सुमारास मध्य नागपुरातील डागा हॉस्पिटल येथे तक्रारदार मिना विनोद हडतकर वय ५२ वर्ष रा. यशोधरानगर यांची मुलगी नामे प्रभा शक्ति पाठराबे वय ३० वर्ष रा. गोळीबार चौक, नागपूर यांची प्रसुती झाली. तिने स्त्री जातीचे नवजात बाळास जन्म दिला. सकाळी ११.३० वा. चे सुमारास वार्डमध्ये एक अनोळखी महिला वय ३० वर्ष हिने येऊन तक्रारदार हिला म्हटले की, मुलगा असेल तर किट मिळेल व मुलगी असेल तर ५०००/— रु. मिळतील असे सांगून सदर बाळाचे कपडे काढावे लागतील असे सांगून तक्रारदार हिची नजर चुकवून नवजात बाळास घेऊन पळून गेली. काही क्षणातच बाळ दिसून न आल्याने कुटुंबियामध्ये भिती व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले. घटनेविषयी नागपूर शहर पोलीसांना माहिती मिळताच, पोलीसांनी तातडीने कारवाई सुरु करुन बाळाची शोधमोहीम सुरु केली.

बाळाचे शोध मोहीमेदरम्यान सर्व पोलीस ठाणे येथे प्रसारीत केलेल्या माहितीचे आधारे, संपुर्ण नागपूर शहर पोलीस कार्यान्वित होऊन, वपोनि यशोधरानगर श्री युनुस शेख यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आसियाना अंजुम सैयद अल्ताफ नावाची महिला तिचे नातेवाईकाचे घरी मेहबुबपुरा, टिपु सुलतान चौक, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे एका नवजात बाळासह संशयास्पद स्थितीत आली आहे. अशा माहितीवरुन त्यांनी व त्यांचे पथक सदर ठिकाणी गेले असता, महिला नामे अफसाना बेगम मोहम्मद कासिम वय ५० वर्ष रा. मेहबुबपुरा, हिचेकडे नवजात बाळ मिळून आले. बाळाबाबत विचारपुस केली असता, तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलीसांनी विश्वासात घेऊन अधिक विचारपुस केली असता, तिने तिची मुलगी नामे आसियाना अंजुम सैयद अल्ताफ वय ३० वर्ष हिने ते बाळ डागा हॉस्पिटल येथुन आणल्याचे सांगितले. सदर बाळ व महिलेस पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आणून वरिष्ठांना तसेच पोलीस ठाणे तहसील येथे माहिती देण्यात आली. सदर नवजात बाळास तक्रारदार यांचे ताब्यात देण्यात आले आहे व पुढील कायदेशीर प्रक्रिया पोलीस ठाणे तहसील येथे सुरु आहे.

नागपूर शहर पोलीसांनी खात्रीशीर माहिती प्राप्त करुन आरोपी महिलेचा शोध घेतला व तिला ताब्यात घेऊन तिचे जवळून नवजात बाळाची वेळीच सुखरुप सुटका केली आहे.

यशोधरानगर पोलीसांच्या संपुर्ण पथकाचे त्यांनी केलेल्या तातडीच्या कारवाइचे मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी अभिनंदन केले आहे. वरील कामगिरी वपोनि श्री युनुस चांद शेख, सपोनि दिलीप पाटील, पोउपनि अशोक हटकर, दत्तु गेठे, मपोउपनि स्वाती देशमुख, वनिता गर्जे, पोहवा राजेश पाली, अमोल बांबुळकर, मंगेश गिरी यांनी केली. पिडीत परिवाराने संपुर्ण नागपूर शहर पोलीस दलाचे मन:पुर्वक व साश्रु नयनांनी आभार व्यक्त केले आहे.



स्वा/—

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.